**पिंपरी चिंचवड महानगरपालिका , पिंपरी - ४११ ०१८**
**जाहिरात क्रमांक -१२१/२०१३**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत शासनाने मंजुर केलेल्या विद्यावेतनावर विहित प्रशिक्षण कालावधी करीता शिकाऊ उमेदवारांच्या नव्याने नेमणुका करावयाच्या आहेत. त्याकरीता खालील व्यवसायाचे उमेदवारांकडून नावासमोर नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार खालील पदाचे संख्येनुसार शिकाऊ उमेदवार भरणेकरीता अर्हताधारक उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | व्यवसायाचे नाव | पदांची संख्या | शैक्षणिक व तांत्रिक पात्रता [सोबत झेरॉक्स प्रती जोडाव्यात ] | प्रशिक्षण कालावधी | विद्यावेतन र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरेखक स्थापत्य | १ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील आरेखक स्थापत्य कोर्स उत्तीर्ण | १ वर्ष | १४४०/- |
| २ | सर्व्हेअर | २ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील सर्व्हेअर कोर्स उत्तीर्ण | १ वर्ष | १४४०/- |
| ३ | प्लंबर | ०७ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील प्लंबर कोर्स उत्तीर्ण | २ वर्ष | प्रथम वर्ष १२४०/-<br>द्वितीय वर्ष १४४०/- |
| ४ | इलेक्ट्रिशियन | ११ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील इलेक्ट्रिशियन कोर्स उत्तीर्ण | १ वर्ष | १४४०/- |
| ५ | वायरमन | ११ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील वायरमन कोर्स उत्तीर्ण | १ वर्ष | १४४०/- |
| ६ | पंपऑपरेटर कम मेकॅनिक | ०७ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील पंप ऑपरेटर कम मेकॅनिक कोर्स उत्तीर्ण | १ वर्ष | १२४०/- |
| ७ | कोपा (पासा) | ३० | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील कोपा / पासा कोर्स उत्तीर्ण | १ वर्ष | १२४०/- |
| ८ | मोटर मेकॅनिक व्हेईकल | ०२ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील मोटर मेकॅनिक व्हेईकल कोर्स उत्तीर्ण | १ वर्ष | १४४०/- |
| ९ | डीटीपी ऑपरेटर | ०४ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील डीटीपी ऑपरेटर कोर्स उत्तीर्ण | १ वर्ष | १२४०/- |
| १० | मेकॅनिक कम ऑपरेटर इलेक्ट्रॉनिक सिस्टीम | ०५ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील मेकॅनिक कम ऑपरेटर इलेक्ट्रॉनिक सिस्टीम कोर्स उत्तीर्ण | १ वर्ष | १९७०/- |
| ११ | पॅथॉलॉजी | ०६ | १२ वी शास्त्र (फिजिक्स, केमिस्ट्री , बायोलॉजी सह ) उत्तीर्ण | ६ महिने | १०९०/- |
| १२ | रेडीऑलॉजी | ०३ | १२ वी शास्त्र (फिजिक्स, केमिस्ट्री , बायोलॉजी सह ) उत्तीर्ण | ६ महिने | १०९०/- |
| १३ | कार्डीऑलॉजी | ०३ | १२ वी शास्त्र (फिजिक्स, केमिस्ट्री , बायोलॉजी सह ) उत्तीर्ण | ६ महिने | १०९०/- |
| १४ | गार्डनर (माळी) | ०९ | १० वी उत्तीर्ण | १ वर्ष | १०९०/- |

**अटी व शर्ती -**

१) सोबत दिलेल्या विहित नमुन्यात प्रत्येक व्यवसायासाठी स्वतंत्र अर्ज करावा. प्रत्येक अर्जासोबत वयाचे पुराव्यार्थ शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक व तांत्रिक अर्हतेच्या पुराव्यार्थ अंतिम गुणपत्रिका व मागासवर्गीय प्रवर्गातील असल्यास सक्षम अधिका-याने दिलेला जातीचा दाखला इ. कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

२) अर्ज मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८ यांच्या नावाने दि. २३/०९/२०१३ पुर्वी पोहचतील अशा बेताने पोष्टाने अथवा समक्ष प्रशासन विभागामध्ये आणुन द्यावेत / पाठवावेत. कोणत्याही कारणास्तव वरील दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३) प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती (Original Certificate) अर्जासोबत जोडु नयेत.

४) वरील व्यवसायाचे उमेदवार संख्येनुसार शासन निर्णयातील आरक्षण विचारात घेऊन उमेदवाराने ज्या राखीव जातीच्या प्रवर्गातील जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर केले

आहे ते विचारात घेऊन आरक्षण व गुणानुक्रमे शिकाऊ उमेदवारांच्या रिक्त जागांवर नेमणुका केल्या जातील.

५) शिकाऊ उमेदवारांच्या नेमणुकांचे अंतिम अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखुन ठेवले आहेत.

६) <u>उमेदवार निवडीची पध्दत -</u>
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये वरील व्यवसायांपैकी कोणत्याही व्यवसायामध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्रथम प्राधान्याने नेमणुका देणेत येतील व उर्वरीत रिक्त जागांकरीता प्राप्त अर्जांचा विचार केला जाईल, महापालिकेस प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन पात्र ठरलेल्या उमेदवारांमधुन आरक्षण व गुणानुक्रमे शिकाऊ उमेदवारांच्या नेमणुका केल्या जातील. पात्र उमेदवारांची यादी महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल.

७) टपाल खात्यामुळे झालेल्या कोणत्याही विलंबास अथवा टपाल गहाळ झाल्यास महापालिका जबाबदार राहणार नाही.

८) **सदरच्या नेमणुका ह्या फक्त शिकाऊ उमेदवार म्हणुन विहित प्रशिक्षण कालावधीसाठी विद्यावेतनावर केल्या जाणार आहेत. प्रशिक्षण कालावधी संपुष्टात आल्यानंतर नेमणुक संपुष्टात आली असे समजणेत येईल. अशा उमेदवारांचा मनपातील कोणत्याही पदांवर हक्क राहणार नाही.**

९) जाहिरातीच्या अनुषंगाने अधिकृत अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरुन Download करुन घेता येईल.

क्रमांक - प्रशा/४/कावि/८३९/२०१३
दिनांक - १६/०८/२०१३

सहा.आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

=[

# शिकाऊ उमेदवारीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति,
मा. आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

विषय :- --------------------- व्यावसायासाठी अर्ज

महोदय,

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवार नेमणुकीसाठी निर्गत केलेल्या जाहिरातीनुसार ------------------------------ या व्यावसायासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून रिक्त जागेवर निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

आडनाव स्वतःचे नाव वडील / पतीचे नाव

१) संपूर्ण नाव :- ____________________

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :- ____________________

____________________

३) जन्मतारीख :-

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ | ९ | | |

४) लिंग - पुरुष स्त्री

५) Email ID : - ----------------- आधार क्रमांक - --------------------------

६) जात :- ____________________

खालीलपैकी लागू असलेल्या प्रवर्गाखालील चौकटीत ✓ अशी खुण करावी.

| अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

७) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल :-

| अ. क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

८) अर्जदाराने धारण केलेल्या तांत्रिक अर्हतेचा तपशिल :-

| अ. क्र. | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नाव | व्यावसायाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

वर नमुद केलेला तपशिल खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणीत प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणीत करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे शिकाऊ उमेदवारी नेमणुकीमधुन कमी करण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ :

दिनांक : /०९/२०१३

अर्जदाराची सही

सहपत्रे : १)